# सेवक वार्ता

नोव्हेंबर-२०२४

वर्ष -६ अंक- २

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र

सेवकची वाटचाल .... नवी आव्हाने

## संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडे तयार करून देण्यासाठी ..... हम है तैयार !!

श्री. विवेक खांडेकर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे दिनांक २०/१०/२०२४ चे पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्या करिता आराखडा निहाय किती निधी सेवक संघाला अपेक्षित आहे व प्रत्येक प्रारूप आराखडा बनविण्यासाठी लागणारा कालावधी या बाबतचे आपले प्रस्ताव या कार्यालयाला त्वरीत सादर करण्याबाबत कळविले आहे.

त्याच पत्रात ते असेही लिहतात व सेवक संघावर विश्वास दाखवतात की, " सेवक संघ यांच्याकडे विशेषज्ञ निवृत अधिका-याचे मनुष्य बळ उपलब्ध असल्याने तसेच त्यानी अगोदर तयार केलेले व्यवस्थापन आराखडे पाहता वन्यजीव संरक्षित क्षेत्राचे आराखडे तयार करून घेण्यात, वनविभागाचे सहकार्य करण्यात आपले सहभागानी सदर काम लवकर संपादित करण्यात मदत होईल".

सेवक संघ यांनी राज्यातील सरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडे तयार करून देण्यासाठी दर्शविलेली तयारी बाबत सेवक संघाचे आभारही मानले आहेत.

वरील पत्रानुसार खालील संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडे बनवणे अपेक्षित आहे

(१) कोलामार्ग संवर्धन राखीव - १८०.७२ चौ. किमी.
(२) भोरगड संवर्धन राखीव -३.४१ चौ. किमी.
(३) ममदापुर संवर्धन राखीव -५४.४६ चौ. किमी.
(४) चांदगड संवर्धन राखीव -२२५.२५ चौ. किमी.
(५) पन्हाळगड संवर्धन राखीव -७२.१० चौ. किमी.
(६) विशालगड संवर्धन राखीव-७२.१६ चौ. किमी.
(७) मसाई पठार संवर्धन राखीव-५.३४ चौ. किमी.
(८) महेन्द्री संवर्धन राखीव-६७.८२ चौ. किमी.
(९) चिवटी बोरी संवर्धन राखीव-६६.०४ चौ. किमी.
(११) मांगरकसा मागरली संवधन राखीव -१०३.९२ चौ. किमी.
(१२) रोहा संवर्धन राखीव -२७.३० चौ. किमी.
(१३) आटपाडी संवर्धन राखीव - ९.४१ चौ. किमी.

त्याबाबत त्यांच्या काही सुचना खालीलप्रमाणे होत.

या संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडे हे १० वर्षाच्या कालावधी साठी पर्यावरण, वन व हवामान बदल विभाग सरकार यांनी त्यांचे पत्र क्र. १४९/२०२२/२०२ दिनांक ३०/११/२०२४ अन्वये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचने नुसार करावयाचे आहे. व्यवस्थापन आराखडा बनविण्यात मुख्यत्वे करून खालील बाबींचा समावेश राहील.

१. आराखडा लिहण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत माहिती, नकाशे व इतर डाटा वन परिक्षेत्र / उप वन संरक्षक / कार्य आयोजना इत्यादी कार्यालयामधून प्राप्त करून घेणे.

२. केंद्र शासनाचे मागदर्शक सूचना व स्थानिय क्षेत्रीय अधिका-याकडून सूचविलेल्या बाबी समाविष्ठ करून आंग्ल भाषेत व्यवस्थापन आराखडाचा प्रारूप टंक लिखित करून घेणे.

३. आवश्यकते नुसार संबंधित संरक्षित क्षेत्राला भेट देऊन आवश्यक सर्व्हेक्षण करणे / डाटा गोळा करणे.

४.प्रस्तावित व्यवस्थापन (Future Management) मध्ये समाविष्ठ करावयाची बाबींबावत सर्व लाभग्राही (Stake Holder) उदाहरण क्षेत्रीय कर्मचारी / अधिकारी, स्थानिक गावकरी, संवर्धन राखीव व्यवस्थापन समिती यांचेशी विचार विनियम करणे,

४.आवश्यक असे डिजिटल मॅप तयार करून देणे.

५. प्रारूप आराखडा तयार करून संबंधित विभागस्तरीय, वृतस्तरीय अधिका-यांशी चर्चा करून त्यांनी सुचविलेल्या बाबींचा समावेश करणे.

६. व्यवस्थापन आराखड्याची Executive Summary तयार करून देणे.

७. राज्यस्तरीय तालीका समिती समक्ष व्यवस्थापन आराखडा ठेवल्यानंतर त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करून अंतिम व्यवस्थापन आराखडा तयार करणे.

८.प्रारूप व्यवस्थापन आराखडा व अंतिम व्यवस्थापन आराखड्याची २ प्रति हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी सादर करावी लागेल. जास्तीच्या प्रती हे वन विभागाकडून मान्यतेनंतर तयार करून घेण्यात येतील.

त्यादृष्टीने नेहमीप्रमाणे श्री.पत्की सरांचे नेतृत्वात नियोजन करणेत येत आहे.

**सेवकची वाटचाल .... नवी आव्हाने**

**वन विकास महामंडळाचे Plantation Inventory Unit कामाकरिता तयारी सुरू**

**दिनांक 12 /9/2024 रोजी मा. गौड सरानी वन विकास महामंडळातील Plantation Inventory Unit कामाकरिता Teak plantation मधील Sample Plot मधील survived teak plants enumeration & height /girth measurements सह teak tree status च्या कामाबाबत विचारणा केली आहे. त्यास होकार देउन तयारी सुरू केली आहे. याकरिता श्री. संजय जगताप यांनी मा. पत्की सरांचे सूचनेनुसार PIU FDCM हा व्हॉटस्अप ग्रुप तयार केला आहे. त्यात सेवक सदस्याना सामावून घेतले आहे.**

**सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा**

**दि. १९-९-२०२४ रोजी पुणे येथे सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखड्यासंबंधात काम प्रगतीपथावर असून त्याचा Inception plan चंद्रपूर वन प्रबोधिनीस सादर करण्यात आला आहे.**

*दिन दिन दिवाळी*

भाग। : ४

लिहिणार : मोरे जी.बी.सर

. ... सिन्नर : (चौगावकर)

साठ वर्षापूर्वी असणारी दिवाळी आणि आजची दिवाळी सारखी असणे शक्य नाही. वैज्ञानिक प्रगतीबरोबर अनेक स्थित्यंतरे खुप जलद घडत गेली. तरीसुध्दा आमच्या गावच्या प्रथा बऱ्याच दिवस तशाच होत्या. शिक्षण आणि नोकरी व्यवसाय निमित्ताने सवंगडी पांगले तरी आम्ही दिवाळीला अगत्याने चौगावला जात असू. टक्कर पाहण्यासाठी का होईना, एकमेकांची भेट होईल या आशेने नदीकाठी जमत असू. दिवाळीच्या सुट्टीत मी , रघू मिस्तरी (खैरनार) ,दहेलकर (दहीवेलकर) माळी बापू , ओंकार बापू अशी चौकडी ईराज नदीच्या वाळूत रात्री कितीतरी वेळ गप्पा मारत बसंत असू. कधीकधी माळी बापू आणि माझी कुस्तीही रंगत असे. रघू बापू मात्र लहानपणापासूनच गंभीर स्वरूपाचा. पण त्याला आमच्या बरोबर रहायला आवडायचे. ईराज नदीतील वाळू वरच्या , नदीकाठी असलेल्या पिंपळ पाराच्या , नदीकाठी असलेल्या वड पिंपळ झाडांच्या कितीतरी आठवणी मनात घर करून बसल्या आहेत. हेल्यांची टक्कर पाहण्यासाठी आम्ही नदीकाठी जमायचो. कोण शाळा मित्र आता कुठे गेला आहे , सध्या काय करतो आहे याची इत्यंभूत माहिती आम्हाला येथेच मिळायची.

शिक्षण पुर्ण झाले. नोकरी लागली. लग्न झाले. दिवाळीच्या सुट्या लागल्या की कधी गावी जाईन असे होवून जायचे.आधी आम्ही सर्वजण चौगावला जायचो. घरी गेल्यावर शेतीच्या सर्व कामात घरच्यांना मदत करायचो. सौ.अलकाला घ्यायला तिच्या माहेरहून कुणीतरी येणार. ज्योती ,जयंत व ती दिवाळीला मोराण्याला जाणार. मी सुट्या संपल्यावर जातांना त्यांना घेवून जाणार. मी जोपर्यंत भाड्याच्या घरात राहत होतो तोपर्यंत हा सिलसिला चालू होता. 98 सालच्या शेवटच्या दिवशी वडील (जिभाऊ) वारले. त्यानंतर दोन महीण्यात माझे सिन्नरमधील घर बांधून पुर्ण झाले. लक्ष्मी पुजनाला आपल्याच घरी थांबणे बरे या विचारातून घरी दिवाळीला जाणे बंद झाले. सहा बहीणीही आपापल्या संसारात गुरफटल्या. त्यांचीही मुलेबाळे मोठी झाली. त्याही दिवाळीला येईनाशा झाल्या. ' लेकीच्या माहेरासाठी आई सासरी नांदते ' या बहीणाबाईच्या कवीतेची प्रचिती येवू लागली.

सरकारी अनास्था, दूरदृष्टीचा अभाव यांमुळे सतत जंगलतोड होत राहीली. गावात फाॅरेस्ट खात्याचे आॅफीस होते. पण तेथील अधिकारी फारसा गावात थांबत नसे. गावाने जंगल वाचविण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा होता. याउलट गावातील दोन समाज जंगल तोडून , शहरात जावून लाकडे विकून उपजीविका करण्यात धन्यता मानत होता. जंगल तोड थांबवण्याचा प्रयत्न गावातील काही तरूणांनी करून पाहिला , नाही असे नाही. पण गावातीलच काही लोकांनी त्यांच्या प्रयत्नांना हरताळ फासला. जंगलात झाडे राहीली नाहीत. डोंगर उघडे बोडके झाले. चारा नष्ट झाला म्हणून गाई म्हशींची संख्या कमी होत गेली. चौगाव परीसरातील जंगलात अंजनची झाडे विपूल होती. उन्हाळ्यात अंजनाला पालवी फुटते.आफट्याच्या पानासारखी अंजनची पाने असतात. आंबट,तुरट चवीचा हा पाला म्हशींना खुप आवडतो. ताजा हिरवा अंजनचा पाला खावून म्हशी जास्त दूध द्यायच्या. पाला ओरपल्याने झाडांचे काहीच नुकसान होत नसे. पण इंधनासाठी जंगलतोड झाली. त्यामुळे गाई म्हशी कमी झाल्या.धरणे बांधून झाल्यामुळे जमीनीला पाणी मिळू लागले. लोकांचा कल शेतीतून नगदी पिके घेण्याकडे वाढू लागला. गावातील जणावरांचे गोठे मळ्यांमधे

हलवले गेले. आमची लहानपणची दिवटी घेवून गाणे म्हणण्याची पद्धत बंद झाली.

हेल्यांची जोपासना करणे लोकांच्या जीवावर येवू लागले. पुर्वी हेला पखालीने पाणी वाहण्यासाठी उपयोगी पडायचा.'जल्माला आला हेला आणि पाणी वाहता मेला'. पखाल समजल्याशिवाय ही म्हण कुणाला कळणार नाही. काही ठिकाणी हेला बैलाबरोबर औताला जुपायचे. म्हशींच्या गर्भधारणेसाठी हेला गरजेचा असायचा. हाल्याची उपयुक्तता आता संपली आहे. आता जन्मतःच त्याच्या मरणाची तजवीज केली जाते. हीच वेळ पुढे बैलांवर येईल असे वाटण्याजोगी आजची स्थिती आहे.त्या जातीवर हा एक प्रकारचा अन्याय आहे. टक्कर खेळण्यासाठी ताकदीचे हेलेच राहीले नाहीत. पुर्वीसारखी हेल्यांची टक्कर आता रंगत नाही. मी नोकरीला लागेपर्यंत हेल्यांची टक्कर होत होती. पण गबाजी गवळी आणि खंडू गवळी यांच्या 'जाण्या' हेल्यासारखी 'जान 'नंतरच्या हेल्यांमधे दिसली नाही. आजही काही प्रमाणात ही प्रथा चालू असल्याचे समजते. पण माणसांच्या गर्दीत होणारी हेल्यांची टक्कर हा प्रकार म्हणजे
'बळजबरीचा रामराम' वाटतो.

विहीरीवरचा हाळ गेला. नदीतील वाळू नाहीशी झाली. नदीचे पात्र बेशरमच्या झाडांनी व्यापले. आता नदीचे पाणी झिरीमिरी नाही तर चांगले खळाळते आहे. पण नदीला आता नाल्याचे रूप आले आहे. माझ्या गाण्यातील बकऱ्या व बकरक्या, गाई आणि गायक्या नाहीसे झाले आहेत. नदीचे पात्र नाही. नदीकाठची वड पिंपळाची झाडे आता राहीली नाहीत. तेथे आता मनुष्य वस्ती आहे. हेल्यांच्या टक्करी आता इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहेत.

फराळासाठी केवळ मुरमुऱ्यांचा चिवडा जावून आता कितीतरी नवनवीन पदार्थ आले आहेत. पण फराळासाठी पुर्वी जसे मित्र, आप्तस्वकीय जमंत तसे आता कुणी जमंत नाही. गोडधोड खायला तर सर्वच जण नकार देतात. दिवाळीच्या आधी आठपंधरा दिवस येणाऱ्या व दिवाळी नंतर आठ पंधरा दिवसांनी सासरी जाणाऱ्या विवाहित मुली आता लक्ष्मी पुजन झाल्यावर येतात . जास्त दिवस थांबायला कुणालाच वेळ नाहीये. पुर्वी खेड्यात लक्ष्मी पुजनाला जास्त महत्त्व नव्हते. झाडणी म्हणजे शिराईला लक्ष्मी माणून तीची पुजा केली की झाले. खेड्यातील लोकं आपल्या जुन्या पद्धती सोडून देऊन शहरी लोकांचे अनुकरण करण्यात धन्यता मानू लागली आहेत.

मोबाईल क्रांतीने जग बदलून टाकले आहे. क्षणात एकमेकांशी संपर्क होत असल्याने एकाच जागेवर बसून एकमेकांना भेटणे शक्य झाले. करमणूकीचे इतके नवीन प्रकार निर्माण झाले की जुने सर्व प्रकार मोडकळीस निघाले आहेत. गावातील धाब्याची घरे जावून सिमेंट काँक्रीटच्या टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. ज्या आई वडीलांच्या ओढीने गावाकडे, घराकडे पाय ओढले जायचे ते आई वडील आता राहिले नाहीत. आपणच आता कुणाचे तरी आई वडील झालो आहोत आणि आपल्या मुलांच्या भेटीसाठी आपणच आता घरी थांबणे गरजेचे झाले आहे. विज्ञानात एक तत्व सांगितले जाते
'All properties are periodic '
सगळेच काही वर्तुळाकार चक्रात फिरत आहेत. काळाच्या या छोट्या जीवनात आपल्याला ते नवीन वाटते. प्रत्येकाला आपले बालपण हवेहवेसे वाटते. गेलेला काळ कधीच परत येत नाही हे सगळ्यांना समजते म्हणून माणूस आठवणीत रमतो. काल्पनिक रित्या का होईना भुतकाळात जगलेल्या क्षणांचा आनंद घेतो. दिन दिन दिवाळीचे दिन आता संपले आहेत. मी चार भागात वर्णन केलेली माझ्या गावची दिवाळी आता माझ्या गावातील आताच्या पिढीलाही नवलाईची वाटेल. सासुरवाशीणला सासरी खुप जाच असायचा. प्रवासाची साधने मर्यादित असल्यामुळे त्यांना फक्त दिवाळी, आखाजीला माहेरला जाता यायचे. त्यामुळे दिवाळीची ते चातकासारखी वाट पहायचे. यांत्रिकीकरणामुळे पुर्वीची कष्टाची कामे कमी झाली. बदलत्या राहणीमानात एकत्र कुटुंब पद्धत कमी होत गेली. सासुरवास जावून उलट म्हाताऱ्या माणसांना सुनवास सुरू झाला. सासर माहेर मधील अंतर कमी झाले. मुली माहेरी पाहुण्यासारख्या कमी वेळ जावू लागल्या आणि सासरी स्वामीनी बनून जास्त रमू लागल्या. परीवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. बदलत्या काळाशी जुळवून घेण्यातच माणसाचे शहाणपण आहे. भुतकाळाचे स्मरण ठेवत , वर्तमान काळाचे भान बाळगत उज्वल भविष्याच्या दिशेने आपली वाटचाल असावयास हवी. काळ बदलत गेला तसतसे दिवाळीचे स्वरूपही बदलत गेले ,बदलत जाणार आहे.

.... समाप्त...।।

* वाचक कळवितात....

## सेवक वार्ता,आक्टोबर-२०२४ दीपावली विशेषांक

सेवक वार्ता,आक्टोबर-२०२४ या दीपावली अंकाचे प्रकाशन श्री संभाजी गवळी यांनी सुंदर,सुबक व साहित्याने अलंकारीक वार्तांनी केले याबद्दल त्यांचे अभिनंदन.

- श्री. व्ही.टी. पत्की

सेवक वार्ता नेहमीप्रमाणे उत्तम आहे.

- श्री. व्ही. बी. सावरकर

*सातत्याने सेवक वार्ता प्रकाशित करण्याचे कार्य आपण एकटे पार पाडीत आहात त्याबद्दल आपले विशेष अभिनंदन

- श्री. संजय जगताप

नेहमी प्रमाणे अतिशय सुंदर, सादरीकरण मस्त धन्यवाद - श्री. उमेश धोपेश्वरकर

➢ **सेवक वार्ता,आक्टोबर-२०२४ दीपावली पुरवणी विशेषांक**

गवळी साहेब, तुम्ही काढलेला इतका आकर्षक, मनमोहक व शानदार दिवाळी अंक वाचून मी अगदी भारावून गेलो. त्याबद्दल तुम्हास त्रिवार धन्यवाद.


- श्री. वसंत जोशी

छान लिहिले आहे. - श्री. एम. एम. कुलकर्णी

## *निधन वार्ता*

**कै.बाबासाहेब पांडुरंग देसाई**

(बा.पा.देसाई) यांचा जन्म २-२-१९३७ रोजी सातारा जिह्यातील कराड येथे झाला होता.बी.एस.सी.पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर,त्यांनी इंडीयन फॉरेस्ट कॉलेज मधून वानिकीची पदविका प्राप्त केली.२८-२-९५ रोजी ते महाराष्ट्र राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक पदावरुन सेवानिवृत झाले.त्यांना दोन सुविद्य पुत्र असून,दोघेही संगणक अभियंता असून,पुण्यात स्थाईक आहेत.पत्नी, सौ.देसाई यांचे २००९ मध्ये स्वर्गवास झाला.दि.४-११-२०२४ रोजी साहेबांचे वार्धक्याने निधन झाले.



कमी बोलणारे,प्रेमळ,कर्तव्यदक्ष आणि निस्पृह वनाधिकारी म्हणून ते प्रसिध्द होते.वनविकास महामंडळाचे पायाभूत अधिकारी म्हणून १९७४ साली ते नासिक प्रकल्प विभागात विभागीय व्यवस्थापक या पदावर कार्यरत होते.मी,त्यांचे मोठे चिरंजीव श्री.राहुल यांना आज भेटून त्यांचे सांत्वन केले व कै.देसाई साहेबांना श्रध्दांजली अर्पण केली.त्यांचा फोटो प्राप्त झाल्यानंतर गृपवर टाकला जाईल. Elite & Sevak यांचे वतीने मी आदरांजली अर्पण केली.

वि.त्र्यं.पत्की.

Very sad news. He was DCF West Melghat before I was posted to Melghat tiger reserve. He was my boss in the Central Evaluation Unit, Pune. After retirement he was a member of the Friday Club in Pune. I used to meet him during the gathering of the club once a month. The club has ceased to exist some years ago. Soft spoken, of few words, warm hearted and kind. I pray for his soul and for the bereaved family members.

- VB Sawarkar

A very quiet officer, I had opportunity to work with him in 87-88 when he was CF Kolhapur.

Shri Desai was staying in a society near bibwewadi and when invited for the SEVAK AGM, some times back may be before COVID outbreak, I had been to him and he chaired the AGM of SEVAK

- Shirish Asthana

भावपूर्ण श्रद्धांजली. CF कोल्हापूर असताना साहेबांशी संबंध आला होता. त्यानंतर ते नागपूर येथे PCCf असताना आम्ही ACF ट्रेनिंग करून आलो तेव्हा भेटलो. आम्हाला ट्रेनिंग ला पाठवलेले कोणाला माहिती नव्हते अशी वाईट परिस्थिती होती. त्यांनी स्वतः याबाबत आम्हाला समोर बसवून फाईल मागवून माहिती घेतली. आमच्या साठी एकदीड तास दिला. याबाबत मी नंतर कळवतो असे सांगून परत पाठवले. अशा सहृदय व्यक्तीला आपण मुकलो आहोत.

- सुभाष पुराणिक

देव हा माणसाच्या मनात जेवढा असतो...
त्यापेक्षा जास्त माणसाच्या कर्मात असतो..
आणि आपल्या चांगल्या कर्मातला देव कोणाला दाखवण्याची गरज नसते...
तो सर्वांना दिसत असतो...
म्हणुन पण कर्मातला देव कधीही टाळू नका.

केवळ खाजगी वितरणासाठी

प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादन - एस. के. गवळी

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६